फ. म. शहाजिंदे यांची कविता: आशय, रूप आणि सामाजिक प्रबोधन

डॉ. प्रांजली निमसटकर (मोरस्कर)
महिला महाविदयालय, नंदनवन, नागपूर
भ्रमण ध्वनी -९३७२७१७६३६

Crossref DOI -

प्रस्तावना :

१९६० नंतरच्या मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि जनवादी साहित्याच्या प्रवाहांनी प्रस्थापित साहित्यमूल्ये बदलून टाकली. या परिवर्तनाच्या काळात मराठवाड्याच्या मातीतून उदयास आलेले आणि आपल्या सडेतोड, विद्रोही लेखणीने स्वतंत्र मुद्रा उमटवणारे कवी म्हणून फ. म. शहाजिंदे (फकीरपाशा महेबूब शहाजिंदे) यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. ग्रामीण आणि मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचे भाष्यकार व बिनीचे शिलेदार म्हणून त्यांनी साहित्याकडे केवळ रंजन म्हणून न पाहता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले.

फ. म. शहाजिंदे यांची कविता ही केवळ निसर्गरम्यतेचे किंवा रम्य ग्रामीण विश्वाचे गोडवे गाणारी नाही, तर ती विषमतेवर प्रहार करणारी, व्यवस्थेला जाब विचारणारी आणि माणसाच्या अस्तित्वाची साक्ष देणारी आहे। 'निधर्मी', 'आदम', 'शेतकरी' (दीर्घ खंडकाव्य), 'ग्वाही' आणि 'झोंबणी' यांसारख्या काव्यसंग्रहांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण व उपेक्षित माणसांच्या जगण्याचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे। त्यांच्या कवितेत मराठवाड्यातील लोकबोलीचा बाज, तिथला राकटपणा आणि मातीची अस्सल स्पंदने स्पष्टपणे जाणवतात.

ग्रामीण साहित्याच्या विकासात जसा मातीचा ओलावा महत्त्वाचा असतो, तसाच तो तिथल्या सामाजिक संघर्षाशीही जोडलेला असतो. फ. म. शहाजिंदे यांनी आपल्या कवितेतून आणि साहित्यातून हाच सामाजिक संघर्ष आणि प्रबोधनाचा वसा अविरत चालवला आहे। मुस्लिम मराठी साहित्याच्या चळवळीत तसेच मराठवाड्यातील साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीच्या उभारणीत त्यांचे कार्य पायाभूत राहिले आहे. आजच्या बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिप्रेक्ष्यात, माणसा-माणसांमधील अंतर वाढताना दिसत असताना, फ. म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील मानवतावादी दृष्टिकोन आणि समतेची मूल्ये समजून घेणे अत्यंत गरजेचे ठरते.

मुख्य संज्ञा : फ. म. शहाजिंदे, ग्रामीण कविता, विद्रोह, आशय व रूप, सामाजिक प्रबोधन, मुस्लिम मराठी साहित्य, शेतकरी काव्य.

फ. म. शहाजिंदे यांच्या कवितेचा आशय :

शहाजिंदे यांच्या कवितेचा आशय हा मानवी जीवनाच्या तळागाळातील अनुभवांतून साकारला आहे. त्यांच्या प्रमुख काव्यसंग्रहांमधून खालील आशयसूत्रे प्रकर्षाने समोर येतात:

धर्मांधतेला विरोध आणि 'निधर्मी' मानवतावाद:

निधर्मी या काव्यसंग्रहात भारतीय समाजातील धर्म व्यवस्था, लोकांच्या धार्मिक कल्पना, अंधश्रद्धा, भोंगळ धार्मिक वाद या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकताना कवी दिसतो. येथे जात पाहून मैत्री केली जाते. एखाद्याला घरही जात पाहून दिले जाते. कविला एका धर्माचा मानू लागतात, तेंव्हा तो खिन्न होतो. तो स्वतःच्या धर्मनिष्ठेकडे व आपल्या धर्म बांधवांच्या धर्मनिष्ठेकडे डोळसपणे पाहू लागतो. खुदब्या दिवशी नावडत्या कविता पाठ केल्यासारखा नमाज पढतो, हेही त्याला आठवते. आपल्या धर्मातील भोंगळ धार्मिकता पाहून तो खिन्न होतो. व आपल्या बांधवांना मातम साजरा करण्याची पद्धत शिकव असे अल्लालाच म्हणू लागतो. मुस्लिमांची ज्याप्रमाणे धार्मिकता नष्ट झाली आहे. त्याप्रमाणे हिंदूंचीही धार्मिकता नष्ट झाली आहे. हेही कविच्या लक्षात येते. मग तरीही दंगे का होतात? हा प्रश्न कवीला पडतो... धार्मिक अधार्मिक अशा दंगली का होत नाहीत? हाही प्रश्न कवीला पडतो. देशभक्तीही राहिली नाही. राष्ट्रध्वजाचे फडके झाले आहे असे कवीला वाटते. निधर्मी मधील कविता अशा प्रकारे सामाजिक जाणिवांतून निर्माण झाली आहे.

कृषी जीवन आणि शेतकऱ्यांची व्यथा :

शेतकरी हे खंडकाव्य शेतक-यांच्या व्यथा, वेदना मांडते. एक शेतकरी आपल्या व्यथा, वेदना स्वतःच आपली कर्मकहाणी सांगत आहे. शेतकरी माणूस अघळ पघळ बोलतो. त्याप्रमाणे हाही शेतकरी बोलताना दिसतो. आपल्या मायबोलीतूनच आपली कथा हा शेतकरी सांगतो. निसर्ग, तलाठी, ग्रामसेवकापासून ते तहसिलदार, जिल्हाधिका-यांपर्यंत गावातल्या राजकारण्यांपासून-मंत्र्यांपर्यंत,मजूरांपासून-व्यापा-यांपर्यंत या शेतक-याची कशी मुस्कटदाबी होते याचे तपशिलवार कथन तो या काव्यातून करतो. दैवाचे सारे भोग आहेत ते चुकणार कसे? असेही त्याला वाटते. तरीही आपल्या भोवती घडणा-या घटनांचे तार्किक विश्लेषण तो करतो. भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही यामध्ये फरक पडला नाही. त्यांच्या कवितेतील कवी म्हणतो-भारतीय शेतक-याला ब्रिटीशांनी पिळून काढले. त्याचे प्रतिबिंब या काव्यात पडले आहे. म्हणून

सरकारने भीकेच्या जागी पत बावी
भीक न देता मालाला भाव द्यावा
म्हंजी समदे सरळ होत्यात...
कोणाचे बी सरकार आले तरी
उत्पादनायर भाव देणं सरकारकडून होणार नाही. [१]

शहाजिंदे यांनी अत्यंत बारकाईने सूक्ष्म निरीक्षण करून ग्रामीण भागातील समाजरचनेपासून परस्पर संबंधांपासून ते सांस्कृतिक मूल्यांपर्यंतचा अभ्यास केला आहे. 'ग्रामीण' 'खेडी' 'शेती' वगैरे शब्दाच्या अधारावर राजकीय जीवन जगणा-या पुढा-यांची या शेतक-याच्या खोल गेलेल्या डोळ्यात डोकावून पहावयाची, राबलेल्या चेह-याची नजर फेकायची. घट्टे पडलेल्या हातात हात घालायची हिंमत चाळीस वर्षात झाली नाही. ती प्रा. फ.म.शहाजिंदे यांनी केली आहे. कंगाल शेतकरी म्हणतो,

तिथं गव-या कसं विकू
कुठंतरी तोंड काळं करावं
आता इथं हायच काय [२]

सोन्याचा धूर करणारा शेतकरी कंगाल झाला याला कंगाल कोणी केले? तर ग्रामीण भागातील अनेक घटकांनी. पूर्वी सावकार लुटत. आता सोसायट्धा, पतसंस्था, बँका शेतक-यांना लुटत आहेत. विकास योजनेच्या नावाखाली शेतकरी तुटत आहे. शेती करणे हाही शेतक-याच्या दृष्टीने गुंता आहे. त्या शेतक-याला कुणीही समजून घेत नाहीत. ही त्याच्या समस्येत पडणारी भर आहे. म्हणून कवी म्हणतो-

शेतक-यांचं दु:ख
शेती करणं गुंता न्हाई तर मग काय हाय?
आपल्या मनात काय हाय
ते बी आपल्या मुखानं जसंच्या तसं सांगता येत नाही.
आज जरी सांगितलं तरी बी
जे सांगायचं हाय तेच ऐकणा-याला कळतं
होची बी ग्यारंटी नसतीया. [३]

शेतक-याला दु:ख मांडता येत नाही. मांडलं तरी समजावून घेता येत नाही. अशी अवस्था आहे. एक वेळ दुश्मन परवडेल पण भावकी ही भयानक असते. प्रा. शहाजिंदे या भावकीच्या कलहाचाही उल्लेख करतात. शेतक-यांच्या अवनतीला, या उद्योगातील, या देशातील शासनाचे धोरण अनेक वेळा कारणीभूत होते. सरकारच्या धोरणाचा शेतकरी बळी आहे. त्यांना आधार देणारी वाटणारी व्यवस्था त्याचाच बळी घेत आहे. हे वास्तव कोणीही नाकारू शकणार नाही.

सरकारी धोरण, योजना यांचा बळी पडणारा शेतकरी, शेतक-याची लूट करणारी केंद्रे, व्यक्ती, शेतक-यांची चळवळ या सर्व बाबींचा विचार शहाजिंदे करताना आढळतात. तरीही त्यांच्या शेतक-याला वाटते. आपली स्थिती सुधारेल. हा आशावाद तो मनाशी बाळगून आहे. म्हणूनच त्यांचा शेतकरी म्हणतो-

जरा नीट इच्यार करा
बगा हामच्याकडं
येणा-या दिसाला तुमी काय
आणि आमी काय अडवू शकत नाही
एक ना एक दिस तुम्ही
हात जोडून झुकून खेड्याकडे याल खेड्याकडे [४]

त्यांचा आदम हाही काव्यसंग्रह आहे. आदम हे पृथ्वीवरील पहिल्या माणसाचे नाव. माणूस देवाच्यामुळे निर्माण झाला. पण त्याला दु:खही सहन करावे लागले. अर्थात यात त्याची काहीही चूक नव्हती. पण शिक्षा भोगणे त्याच्या वाट्याला आले खरे तर आदमला कोणतीही जात नव्हती. पण आता मात्र माणूस जात व धर्म मिरविताना दिसतो. शहाजिंदे यांचीही व्यथा एकच आहे. ती म्हणजे या धर्मनिरपेक्ष देशात कोणालाही माणूस म्हणून जगता येत नाही. म्हणूनच ते म्हणतात-

"अरे बाबा, समुहाला खडसावणाऱ्यांच्या नशिबी उत्सव नसतात

ते समुहाला गोंजारणाऱ्यांच्या नशिबी असतात
मग मला सांग, तुझ्या नशिबी उत्सव कसले असणार?
त्यासाठी इथे कुठलीतरी एकच जात असावी लागते रे!
नुसतं माणूस असणं बरं नसतं राजा !
कारण तो दोन्हीकडून ठेचाळत राहतो रे!" [५]

शेती व्यवस्था भ्रष्टाचाराच्या किती खोल खड्यात अडकली आहे याचे दर्शन परंपरा ही कविता घडविते. साखर कारखान्यातील साखर मुंग्या खात आहेत. एकाधिकार खरेदीतील कापूस अग्निदेवतेलाच चढविला जातो. तर दुष्काळग्रस्तांसाठी जमविलेले अन्न घुशी खात आहेत. विहिरी कर्जाच्या पायात चोरीला जात आहेत. चोरच कोतवालांना दटावतोय की तुम्ही इथं कशाला ड्युटी करताय? विविध योजनांमधून लाखोंची खिरापत बाटली जाते. म्हणून तर काही माणसांना भाकरी खायला मिळते. कृष्णानेही सोन्याचीच द्वारका उभारली होती म्हणूनच कवी म्हणतो-

"इथली परंपराच अशी आहे की,
सत्ताधाऱ्यांनी इथे श्रीमंतच व्हायला हवे" [६]

असेच या व्यवस्थेचे आहे. जे सत्ताधीश आहेत तेच सुखी आहेत. पण ज्यांच्याकडे सत्ता नाही ते दिवस ढकलण्याशिवाय काही करू शकत नाहीत.

इथे त्यांच्या मायला
पिकविणारा मोठा नाही
तर खरेदी- इक्री करणारा मोठा हा
भाव बारे म्हनलं तर
गोळ्या घालतेत आन वरून
भारत शेती परधान हाय म्हनेत
गेल्या जल्मी शेतक-याने पापं केली होती का हो साहेब?[७]

या कवितेबद्दल भालचंद्र फडके म्हणतात 'शहाजिंदे' यांच्या कवितांतून त्यांची दुःखे बोलकी होतात. आणि अभावग्रस्त समाजाच्या गाऱ्हाण्याचे सूरही मोकळे होतात. त्यांची मुख्य व्यथा आहे की, या देशात खरा न्याय मिळू शकणार नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय ही मानवी मुल्ये कागदावरच आहेत. वास्तवात येथील सामान्य माणसांची मानसिक गुलामगिरी संपलेली नाही.'[८] शहाजिंदे' चा गौरव करताना कैलास सार्वेकर म्हणतात ,"आजच्या शेतक-याचे प्रातिनिधिक आत्मोद्गार असलेल्या या काव्यात त्यांच्या विचारांचा, श्रद्धांचा, समज-अपसमजांचा, एकूण शेतकरी जीवनाचा संपूर्ण पटच मांडला गेला आहे हे मान्य करावे लागेल'".[९]

सामाजिक प्रबोधन आणि साहित्यिक योगदान :

फ. म. शहाजिंदे यांची कविता ही 'कलेसाठी कला' या भूमिकेला नाकारून 'जीवनासाठी कला' या तत्त्वाचा पुरस्कार करते.

वैचारिक जागृती :

अंधश्रद्धा, कर्मकांड आणि परंपरांच्या जोखडातून समाजाला मुक्त करण्याचे काम त्यांची कविता करते. धर्मग्रंथांच्या पलीकडे जाऊन विज्ञानाची आणि विवेकाची कास धरण्याचा संदेश ते देतात.

सर्वसमावेशकतेचा आग्रह :

मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील संवाद वाढवण्याचे काम केले. त्यांची कविता हिंदू-मुस्लिम ऐक्याची आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची पाठराखण करते.

शोषितांना आत्मभान :

ग्रामीण भागातील कष्टकरी आणि उपेक्षित वर्गाला आपल्या शोषणाची जाणीव करून देऊन, अन्यायाविरुद्ध संघटित होण्याचे बळ त्यांची कविता देते. प्रबोधनाची ही परंपरा महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्याच्या वैचारिक वारशाशी नाते सांगणारी आहे.

निष्कर्ष :

फ. म. शहाजिंदे यांची कविता ही समकालीन मराठी साहित्यातील एक अत्यंत महत्त्वाची आणि जिवंत दस्तऐवज आहे. ग्रामीण वास्तवाचे केवळ वरवरचे चित्रण न करता, त्यामागील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कारणांचा शोध घेणारी त्यांची दृष्टी त्यांना समकालीन कवींमध्ये वेगळे ठरवते. आशयाची प्रगल्भता, बोलीभाषेचा जिवंतपणा आणि सामाजिक प्रबोधनाची तीव्र तळमळ यांमुळे त्यांची कविता केवळ वाङ्मयीनदृष्ट्याच नव्हे, तर समाजशास्त्रीयदृष्ट्याही अत्यंत मोलाची ठरते.

फ. म. शहाजिंदे सर्व सामान्याची, शेतकऱ्यांची व निधर्मीवादी लोकांची दुःखे सारख्याच ताकदीने मांडतात. शेतकरी या त्यांच्या खंडकाव्यात शेतकऱ्यांची दुःखे सूक्ष्मपणे व परखडपणे त्यांनी चित्रित केली आहेत. रानात व सामाजात तितकाच तन्मयतेने वावरणारा हा समर्थ कवी आहे. चांगली सामाजिक जाणिव असणारा हा कवी आहे.

संदर्भ ग्रंथसूची :

- फ.म.शहाजिंदे, शेतकरी, औराद शहाजानी, आंतरभारती प्रकाशन १९८५, आवृत्ती नाही, पृष्ठ १३८
- तत्रैव, पृष्ठ- १
- तत्रैय, पृष्ठ – ६३
- तत्रैव, पृष्ठ – २५२
- फ.म.शहाजिंदे, आदम, औराद शहाजानी, आंतरभारती प्रकाशन, १९९१, प्रथमावृत्ती, २८ पृष्ठ-२३
- तत्रैय, पृष्ठ- १९
- तत्रैव, पृष्ठ ३०
- तत्रैय, पृष्ठ ७

- कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९९, प्रथमावृत्ती, पृष्ठ - २२२

Research Hub International Journal